नि.दि.दा.क्र. २५५/२०१७
देवराज मोटे वि. सुग्रीव मोटे

# <u>निशाणी क्रं.५५ वरील आदेश</u>

१. वादीने प्रस्तुत अर्ज दाव्यात दुरुस्ती करणेकरीता दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केले आहे.

२. वादीने त्याच्या अर्जात असे कथन केलेले आहे की, प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादी विरुध्द सरस निरस मानाने वाटप होवुन कब्जा मिळणेकरीता दाखल केलेला आहे. दाव्याचे समन्स बजावणी झाल्यानंतर प्रतिवादी क्रं. १ ने दावा मिळकतीपैकी दावा कलम १अ ते १क या मिळकती तहसिलदार माळशिरस यांचेकडे अर्ज देवुन वादीच्या संमतीशिवाय प्रतिवादी क्रं. १ चा मुलगा संजय सुग्रीव मोटे यांच्या नावे वाटप केलेचा आदेश तहसिलदार माळशिरस यांचा घेतलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्रं. १४ नंतर प्रतिवादी क्रं. १५ संजय सुग्रीव मोटे, वय – ४० वर्षे, धंदा – शेती, रा. एकशिव, ता. माळशिरस, जि. सोलापुर असे दाव्याच्या सरनाम्यात सामील करुन दावा कलम ३ब नंतर ''३क. सदरचा दावा प्रलंबित असताना .........बंधनकारक नाही'' असे समाविष्ट करणेत यावे. तसेच निशाणी क्रं. ५२ वरील तुर्तातुर्त अर्जामध्ये ४अ नंतर ''व प्रतिवादी क्रं.१...हुकूम व्हावा'' असा मजकुर समाविष्ट करुन दुरुस्ती होणेकरीता परवानगी मिळणेबाबत प्रस्तुत अर्ज मंजुर होणेची विनंती केलेली आहे.

३. प्रतिवादी क्रं. १ ने निशाणी क्रं. ६६ वर त्याचे म्हणणे दाखल करुन अर्जातील कथने नाकारलेली आहेत. प्रतिवादी कथन करतो की, प्रस्तुत अर्ज बेकायदेशीर असुन मिळकत वडीलार्जित नसुन ती तिच्या आईकडुन फेरफार क्रं. १०७३ ने वाटपाने मिळालेली त्यास मिळाली आहे. सदर बाब वादींना माहित असुनही त्यांनी कोठेही दावा दाखल करेपर्यत तक्रार केलेली नाही. त्यामुळे अर्ज नामंजुर करणेत यावा अशी विनंती केलेली आहे.

**४.** अर्जाचे, म्हणणेचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी तर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीने कथन केल्याप्रमाणे त्याने प्रस्तुत दावा सरस निरस मानाने वाटप होवुन कब्जा मिळणेकरीता दाखल केलेला आहे. दाव्याच्या सरनाम्यात प्रतिवादी क्रं. १५ म्हणुन संजय सुग्रीव मोटे यास समाविष्ट करुन इतर मजकुर दाव्यात व अर्जात नमुद करुन तशी दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेकरीता अर्ज मंजुर करणेची विनंती केलेली आहे. याउलट प्रतिवादी क्रं. १ ने अर्ज बेकायदेशीर असुन वादींनी दावा दाखल करण्यापुर्वी सदर बाब वादींना माहिती होती. परंतु त्यांनी त्याबाबत कोठेही त्याची तक्रार केले नसल्याने अर्ज नामंजुर करणेत यावा अशी विनंती केलेली आहे. दावा मिळकती सद्यस्थितीत संजय मोटे यांच्या नावे दिसत असल्याने तसेच तो प्रतिवादी क्रं. १ चा मुलगा असल्याने वाटपाच्या दाव्यात त्याला समाविष्ट करणे गरजेचे आहे. प्रतिवादी क्रं. १ च्या कथनांनुसार सदर मिळकत ही त्याच्या आईकडुन आली असल्याने त्याच्याशी वादीचा संबंध नाही. परंतु दावा हा सरस निरस मानाने वाटपाचा असल्यामुळे सर्व आवश्यक पक्षकार व सर्व मिळकती समाविष्ट करणे गरजेचे आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे आवश्यक दुरुस्ती करता येतात. तसेच सदर दुरुस्तीमुळे दाव्यामध्ये बदल होणार नाही शिवाय दावा संपुर्ण गुणदोषावर निर्णय होणे सोयीस्कर होणार आहे. करिता सदरची दुरुस्ती मंजुर करणे न्यायोचित होईल. करिता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | निशाणी क्र. ५५ वरील अर्ज मंजुर करण्यात येते. |
| २. | अर्जदाराने नियमानुसार १४ दिवसांच्या आत अर्जामध्ये दुरुस्ती करुन, दुरुस्ती अर्जाची प्रत पुढील तारखेपर्यंत अभिलेखावर दाखल करावी. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by AADITYA AVINASH VYAS
Date: 2026.07.06 17:54:14 +0530

(आदित्य अ. व्यास)

दिनांक : ०६.०७.२०२६. २रे सह दिवाणी न्यायाधिश,क.स्तर, माळशिरस

# CERTIFICATE

I affirm that the contents of the P.D.F file Order is same word to word as per the original Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | :- | S.T.Korbu |
| (b) | Name of the Court | : | 2nd Jt. C.J.J.D & J.M.F.C, Malshiras, Dist. Solapur |
| (c) | Order signed by P.O. On | :- | 06/07/2026. |
| (d) | Order uploaded on | :- | 06/07/2026. |